MHKO150002402025

नि. दि. दावा क्र. २८/२०२५.
निर्मला वि. सोनाबाई व इतर.

<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश.</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अंतर्गत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ व २ यांना न. भू. क्र.४५६ ज्यासी ग्रा. मि. क्र.७५१ च्या खुल्या जागेमध्ये नवीन रस्ता करुन पुर्व बाजूला घराचे बांधकाम करुन उकीरडा करुन त्यांच्या ताब्यास अडथळा करु नये याबाबत तूर्तातूर्त मनाई ताकीद देण्याची विनंती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन –**

२. वादी व प्रतिवादी क्र.३ हे पती– पत्नी असून न. भू. क्र.४५६ / ग्रा. मि. क्र.७५१ ही प्रतिवादी क्र.३ च्या मालकी ताब्याची मिळकत आहे. प्रतिवादी क्र.१ व २ या प्रतिवादी क्र.३ च्या विवाहीत बहिणी असून त्यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादी क्र.१ व २ हे पेरणोली येथे राहत असून त्यांनी मयत जानू ऊर्फ जानबा कांबळे याच्या मालकीच्या ग्रा. मि. क्र.७४९ व ७५० वरती अतिक्रमण करुन घराचे बांधकाम केले आहे. त्याबाबत वादी व शकुंतला कांबळे यांनी त्यांच्या विरोधात नि. दि. दा. क्र.४६/२०२३ दाखल केला आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ व २ च्या विरोधात दाखल केलेल्या दाव्यामुळे चिडून ते तिला व तिच्या मुलांना त्रास देण्यासाठी त्यांच्या विरोधात खोटी दिवाणी व फौजदारी प्रकरणे दाखल करत आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना वादीच्या अपरोक्ष उत्तर बाजूने ग्रामपंचायत रस्त्यापासून दावा मिळकतीच्या पूर्व बाजू पर्यंत नवीन रस्ता करुन खुल्या जागेत नवीन बांधकाम करण्याच्या उद्देशाने साहित्य आणून टाकले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ या वादींच्या घराला लागून पाठीमागील पूर्व बाजूला जनावरांचे शेण टाकत आहेत. वादीने त्याबाबत प्रतिवादी क्र.१ व २ कडे विचारणा केली असता, त्यांनी बांधकाम करण्याची धमकी देऊन सांडपाण्याच्या पाईपला खुंटी मारुन ते बंद केले आहे. सबब, वादीने तिच्या दावा मिळकती वरील ताब्यातस अडथळा होऊ नये याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**प्रतिवादींचे थोडक्यात कथन –**

**३.** प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्याच्या आदेशिका मिळून देखील ते हजर झालेले नसल्यामुळे त्यांच्या विरोधात दावा एकतर्फा चालवण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.३ ने नि. क्र.१२ प्रमाणे लेखी म्हणणे सादर करुन वादीचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**विचाराधीन मुद्दे आणि त्यांचे निष्कर्ष –**

**४.** अर्ज व लेखी म्हणणे वाचले. वादी आणि प्रतिवादी क्र.३ च्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन या न्यायालयाच्या विचारासाठी खालील मुद्दे निघत असुन मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | वादींच्या बाजुने प्रथमदर्शी प्रकरण आहे काय ? | . . **नाही.** |
| **२.** | वादींच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे काय ? | . . **नाही.** |
| **३.** | वादींचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे नुकसान होईल काय ? | . . **नाही.** |
| **४.** | काय आदेश? | . . **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**कारणेमिमांसा –**

**विचाराधीन मुद्दा क्र.१ ते ३ साठी –**

**५.** विचाराधीन मुददा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतपणे घेतले आहेत. वादी व प्रतिवादी क्र.३ च्या वकीलांनी, प्रतिवादी क्र.१ व २ यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसून ते अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने बांधकाम करणार असल्यामुळे तसेच त्यांच्या कृत्यामुळे शारिरीक स्वास्थ्य धोक्यात आलेले असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी पुढे, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाव्याच्या आदेशिका मिळून देखील हजर होऊन त्यांच्यावरील आरोप नाकारलेले नसल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**६.** दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ प्रमाणे दाव्यातील कोणतीही मालमत्ता कोणत्याही

पक्षाकडून वाया जाण्याचा, नुकसान होण्याचा किंवा त्यापासून दूर जाण्याचा अथवा कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात प्रतिवादी वादीला त्याचा कब्जा काढून घेण्याची धमकी देत आहे अथवा त्याविषयी वादीला क्षती पोहोचवत आहे असे सिद्ध करण्यात आल्यास न्यायालयाला दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत अशा कृतीला विरोध करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाई हुकूम देता येईल किंवा अशा मालमत्तेचा अपव्यय नुकसान अतिक्रमण विक्री ती हलवणे अथवा तिची विल्हेवाट लावणे किंवा दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात वादी कडून कब्जा काढून घेणे किंवा वादी क्षती पोहोचवणे या गोष्टी स्थगित करण्याचा आणि त्यांना प्रतिबंधित करण्याच्या योजनेसाठी न्यायालयाला योग्य वाटेल असा अन्य आदेश देता येऊ शकतो.

**७.** जरी प्रस्तूत दाव्याकामी प्रतिवादी क्र.१ व २ हजर झालेले नसले तरी तूर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश मिळवण्यासाठी वादींनी प्रथमदर्शी प्रकरण व न्यायाचा समतोल त्यांच्या हक्कात असल्याचे सिध्द करणे गरजेचे आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मयत जानबा कांबळे व त्याची पत्नी नानूबाई कांबळे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नावे असलेल्या ग्रा. मि. क्र.७४९ व ७५० वरती अतिक्रमण करुन घराचे बांधकाम केले आहे. त्यास वादी व शकुंतला कांबळे यांनी आक्षेप घेतल्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ या वादीच्या परिवाराला त्रास देण्याकरीता खोटया दिवाणी व फौजदारी कारवाया करत आहेत.

८. वादीने ग्रा. मि. क्र.७४९ व ७५० मधील मिळकती सोबत असलेल्या तिच्या अधिकाराचा आणि त्याबाबत दावा दाखल करण्यास काय कारण आहे याचा खुलासा केलेला नाही. दावा मिळकत ग्रा. मि. क्र.७५१ ही वादीच्या मालकीची मिळकत नाही. प्रतिवादी क्र.३ ने त्याला दावा दाखल करण्यास काय अडचण होती याबाबतचा कोणताही खुलासा केलेला नाही. वादीने दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी रस्ता आणि उकीरडा केल्याचे दर्शवलेले आहे. यावरुन सदर मिळकत वादीच्या ताब्यात नसल्याचे प्रथमदर्शी दिसून येत आहे.

**९.** वादीला प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केलेल्या रस्त्यामुळे, उकीरडयामुळे आणि सांडपाणी अडवल्यामुळे होत असलेल्या त्रासाबाबत त्यांच्या विरोधात संबंधित विभागा मार्फत कारवाई करता येऊ शकते. परंतु, वादीने त्याबाबत संबंधित विभागाकडे केलेल्या तक्रारीचा कोणताही

प्रथमदर्शी पुरावा सादर केलेला नाही. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे, तीने केलेल्या  दाव्याच्या कारणाने प्रतिवादी क्र.१ व २ हे चिडून त्यांना त्रास देण्यासाठी खोटया तक्रारी करत आहेत. यावरुन वादी व प्रतिवादीं मधील नातेसंबंध तणावाचे असून न्यायालयीन प्रकरणांचा ते एकमेकांच्या विरोधात वापर करत असल्याचे दिसून येते.

**१०.** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकती वरती अतिक्रमण करुन उपद्रव केला आहे किंवा नाही या बाबी अंतिम पुराव्याने सिध्द होणा–या आहेत. न्यायालयाने तुर्तातुर्त मनाई हुकमाचा अर्ज मंजुर करताना तीन महत्वाच्या बाबी म्हणजे सकृतदर्शनी प्रकरण, न्यायाचा समतोल व अर्जदाराचे अपरीमीत नुकसान पाहणे महत्वाचे आहे. वादी प्रतिवादींच्या बेकायदेशीर कृत्याबाबत संबंधित विभागाकडे दाद मागू शकते. परंतु, तीने त्याबाबतची कोणतीही पुर्तता केलेली नाही. तसेच दाव्यासोबत सादर केलेल्या नकाशा प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या ताब्यात रस्ता व उकीरडयाची मिळकत असल्याचे दिसून येत आहे. यावरुन सदर भाग वादीच्या ताब्यात नसल्याचे दिसून येत असून अर्ज मंजूर केल्यास तिच्याद्वारे आदेशाच्या साहाय्याने ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. सबब, वादी ही तिच्या हक्कात प्रथमदर्शी प्रकरण व न्यायाचा समतोल असल्याचे सिध्द करु शकलेली नसल्यामुळे तीची तूर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी मान्य करता येऊ शकत नाही. त्यामुळे हे न्यायालय वरील विवेचना वरुन मुद्दा क.१ ते ३ चे निष्कर्ष नाही असे नोंदवत आहे.

**मुददा क्र. ४ साठी**

**११.** मुददा क्र. १ ते ३ च्या नाही या निष्कर्षांचा विचार करता, हे न्यायालय मुद्दा क्र. ४ साठी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे,

**आदेश**

**१.** अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जाचा खर्च अंतिम निकालाप्रमाणे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

(जे. ओ. कोड–०२८९७)

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

आजरा.

दिनांक – १५.१२.२०२५.

ठिकाण – आजरा.